# नगर परिषद,लोणार

## अनिकेत राजेश मापारी

### नगरसेवक

निकीता सर्वो पेट्रोलियन,लोणार मु.पो.लोणार ता.लोणार जि.बुलडाणा
Mo.8888991545 E-mail.Id- aniketmapari5@gmail.com

दि. 15 /09/ 2026.

प्रति,

**मा.ना.एकनाथजी शिंदे**

उपमुख्यमंत्री तथा नगर विकास मंत्री

महाराष्ट्र शासन,मुंबई– ४०००३२

विषय : लोणार नगरपरिषदेस पूर्णवेळ व नियमित मुख्याधिकारी नियुक्त करण्याबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय निवेदन करण्यात येते की, लोणार नगरपरिषदेस सध्या नियमित व पूर्णवेळ मुख्याधिकारी उपलब्ध नसून, सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आलेला आहे. परिणामी, नगरपरिषदेच्या प्रशासकीय कामकाजाचे प्रभावी संचालन तसेच शहरातील विविध विकासकामांचे नियोजन, अंमलबजावणी, संनियंत्रण व प्रशासकीय समन्वय यावर प्रतिकूल परिणाम होत आहे.

लोणार शहरास ऐतिहासिक, धार्मिक, नैसर्गिक व पर्यटनाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झालेले आहे. लोणार सरोवर व परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांमुळे लोणार हे राज्यातील तसेच देशातील महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून विकसित होत आहे. शहराची पर्यटन क्षमता विचारात घेता, लोणार नगरपरिषद क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा व नागरी सुविधा बळकटीकरणासाठी विविध विकासकामे हाती घेण्यात आलेली आहेत.

सदर विकासकामांची वेळेत व गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी, प्रशासकीय व तांत्रिक बाबींचे संनियंत्रण, निधीचा नियमानुसार विनियोग, संबंधित विभागांशी समन्वय, कामांची प्रगती तपासणी तसेच शासनाच्या विविध योजना व प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी यासाठी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पदावर पूर्णवेळ व नियमित अधिकारी कार्यरत असणे आवश्यक आहे.

सध्या अतिरिक्त कार्यभाराच्या स्वरूपात प्रशासकीय जबाबदारी पार पाडली जात असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर त्यांच्या मूळ पदाच्या जबाबदाऱ्यांसह अतिरिक्त प्रशासकीय जबाबदारी येत आहे. त्यामुळे लोणार नगरपरिषदेच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजास अपेक्षित वेळ देणे तसेच शहरातील सुरू असलेल्या विविध विकास प्रकल्पांचे सातत्यपूर्ण नियोजन, पर्यवेक्षण, संनियंत्रण व आढावा घेणे

# नगर परिषद,लोणार

## अनिकेत राजेश मापारी

### नगरसेवक

निकीता सर्वो पेट्रोलियन,लोणार मु.पो.लोणार ता.लोणार जि.बुलडाणा
Mo.8888991545 E-mail.Id- aniketmapari5@gmail.com

दि. 15 /09 /2026

अपेक्षित कार्यक्षमतेने शक्य होत नाही. याचा परिणाम विकासकामांच्या प्रगतीवर व त्यांची विहित कालमर्यादित पूर्तता करण्यावर होण्याची शक्यता आहे.

विशेषतः लोणार शहराचा पर्यटनदृष्ट्या नियोजित विकास करण्याच्या अनुषंगाने नागरी पायाभूत सुविधा, स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन, रस्ते, पाणीपुरवठा, सार्वजनिक सुविधा, पर्यटक सुविधा, शहर सुशोभीकरण तसेच पर्यावरण संवर्धनाशी संबंधित कामांना प्रभावी प्रशासकीय नेतृत्व व सातत्यपूर्ण संनियंत्रणाची आवश्यकता आहे.

त्यामुळे लोणार नगरपरिषदेच्या प्रशासकीय कार्यक्षमतेत वाढ होण्यासाठी, प्रलंबित व सुरू असलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी आणि लोणार शहराचा पर्यटनदृष्ट्या नियोजित व शाश्वत विकास सुनिश्चित करण्यासाठी लोणार नगरपरिषदेस तातडीने नियमित, पूर्णवेळ व स्वतंत्र मुख्याधिकारी नियुक्त करण्यात यावा, अशी विनंती आहे.

मा. महोदयांनी सदर बाबीची तातडीने दखल घेऊन संबंधित सक्षम प्राधिकरणास आवश्यक निर्देश देऊन लोणार नगरपरिषदेस नियमित व पूर्णवेळ मुख्याधिकारी उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही तातडीने करण्यात.यावी, ही नम्र विनंती.

प्रतिलिपी,

१) अप्पर मुख्य सचिव व प्रधान सचिन नगरविकास विभाग,मुंबई
२) मा.आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय,मुंबई
३) मा.विभागीय आयुक्त,अमरावती विभाग अमरावती
४) मा.जिल्हाधिकारी,बुलढाणा